# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**अहमदनगर जिल्हा शासकीय रूग्णालयात मोठ्या प्रमाणात डॉक्टराची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१) २३५९ (२२-१२-२०१४). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा शासकीय रूग्णालयात मोठ्या प्रमाणात डॉक्टराची पदे रिक्त असल्याने रूग्णांना सेवेचा लाभ मिळण्यास अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर रूग्णालयातील रिक्त असलेली डॉक्टराची पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०६-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

वैद्यकीय अधिकारी गट-अ मधील एकूण मंजूर ५३ पदापैकी ११ पदे रिक्त असली तरी आयपीएचएस अंतर्गत कंत्राटी तत्वावर विशेषज्ञांची पदे भरण्यात आलेली असल्यामुळे रुग्णांना सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.

(२) व (३) वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्ह्यातील रोजगार, कृषी क्षेत्राचा विकास करण्याबाबत**

**(२) १२७५३ (०८-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील रोजगार कृषी क्षेत्राच्या विकासासह व्यसनाधीनता कमी करण्याकरिता नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत जिल्हा परिषदेला प्रस्ताव पाठविण्याची सूचना वर्धा जिल्हा पालकमंत्री यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत शासनास सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) या तालुक्यातील ग्रामपंचायत अडगाव बु. व इतर काही ग्रामपंचायत अंतर्गत खचलेल्या विहिरींचे अंदाजपत्रके सादर करण्याबाबत**

**(३) १७०१२ (१९-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) या तालुकयातील ग्रामपंचायत अडगाव बु. व इतर काही ग्रामपंचायत अंतर्गत खचलेल्या विहिरींचे अंदाजपत्रके सादर न करणाऱ्या संबंधितांवर कार्यवाही करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव खंडेश्वर, अमरावती यांना दिनांक १४ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) ग्रामपंचायत अडगांव बु. येथील ३९ खचलेल्या विहिरींना तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी १३ विहिरी पूर्ण झालेल्या आहेत. उर्वरित विहिरींबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने चौकशी सुरु होती. त्यामुळे कामे सुरु झाली नव्हती. सद्य:स्थितीत या संदर्भातील जिल्हास्तरीय चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला असून त्यातील निष्कर्षानुसार अपूर्ण परंतू पात्र विहिरींची प्रलंबित कुशल देयके निकाली काढण्यात आली आहेत. चौकशी अहवालानुसार अपात्र ठरलेल्या तीन लाभार्थ्यांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याबाबत गट विकास अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. याशिवाय नांदगाव खंडेश्वर पंचायत समिती मधील इतर ग्रामपंचायतीमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या निकषाप्रमाणे तसेच ग्रामपंचयात स्तरावरुन प्राप्त ग्रामसभा ठरावानुसार आणि स्थानिक मजुरांच्या मागणीनुसार १०६ खचलेल्या विहिरींना तांत्रिक मान्यता घेऊन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव खंडेश्वर यांनी दि.३०.४.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आदर्श ग्राम योजना राबविण्याबाबत**

**(४) ४०३५० (०४-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१३-१५ या तीन वर्षात १ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दखल घेवून, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी गावे दत्तक घेण्याचे निर्देश दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास राज्य शासनास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेता, या आधीच राज्य शासनाने "आदर्श ग्राम योजनेंतर्गत" गावे दत्त घेण्याकरिता विधानसभा व विधानपरिषद ३६२ सदस्यांना प्रत्येकी तीन गावे दत्तक घेण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आदर्श ग्राम योजनेंतर्गत अद्यापर्यंत किती सदस्यांनी गावे निवडून त्या गावात आदर्श ग्राम योजना सुरु केली आहे तसेच किती सदस्यांनी अद्यापपर्यंत गावे निवडण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, राज्यात आदर्श ग्राम योजना तातडीने राबविण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०६-२०१८) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यात शेततळ्यांचे रेकॉर्ड गहाळ झाल्याबाबत**

**(५) ५४९७३ (२४-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील पाणलोट मनरेगा अंतर्गत झालेल्या शेततळ्यांच्या कामाची चौकशी चार पथक करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी करताना समितीने अनेक देयके ताब्यात घेण्याचे ठरविले असता अनेक कामांचे रेकॉर्ड गहाळ झाल्याचे चौकशीत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे सलगरा बु. हतराळ, सावळी, कलंबर आदी विटाकणच्या कामाची चौकशी केली असता एम.बी. (मोजमाप बुकामध्ये) मध्ये खर्च केल्याची नोंद घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच नांदेड जिल्ह्यात पाणलोट, जलयुक्त शिवाराची कामे करणारे कंत्राटदार लातूर, उस्मानाबाद, परभणी आदी जिल्ह्यात पाणलोट, जलयुक्त शिवारांची कामे करीत असल्याबाबत एका अधिकाऱ्याने निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(६) असल्यास, चौकशीनुसार रेकॉड गहाळ करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०३-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) नाही.
(५) व (६) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असुन दोषी आढळुन आलेले अधिकारी तालुका कृषी अधिकारी -१, मंडळ कृषी अधिकारी -२ यांचे विरुध्द कृषी आयुक्तालय यांचेकडे प्रशाकीय कार्यवाहीचा प्रस्ताव सादर केला असून दोषी कर्मचारी कृषी पर्यवेक्षक -३ , कृषी साहाय्यक-६ यांना निलंबित केलेले आहे.
(७) निरंक.

---

**भूम-परांडा-वाशी (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील मनरेगाच्या माध्यमातून कामे करणाऱ्या मजूरांना थकीत मजूरी देण्याबाबत**

**(६) ५५३३२ (१०-०८-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूम-परांडा-वाशी (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील मनरेगाच्या माध्यमातून मजूरानी कामे करुनही गेली ४ महिने मजूरी न मिळाल्यामुळे मजूरांनी तहसिलदार परांडा यांच्या कार्यालयासमोर दिनांक ६ जून, २०१६ रोजी पासून उपोषणाला बसले होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच मजूरांना त्वरीत मजूरी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.रोजगार हमी योजना मंत्री यांना दिनांक ६ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनानुसार मजूरांना मजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०३-०८-२०१८) :** (१) नाही. तथापि मौजे खासापूरी येथील माजी सरपंच श्री. शंकर चव्हाण यांनी यापूर्वी दि. ९ मे २०१६ रोजी सन २०१२-१३ व त्यापूर्वीच्या प्रलंबित देयकाबाबत खासापूरी (चव्हाणवाडी) ता.परंडा, जि.उस्मानाबाद येथे उपोषण केले आहे.

(२) होय. तथापि तत्कालिन मा.मंत्री (रोहयो) यांना सन २०१२-१३ व त्यापूर्वीच्या प्रलंबित देयकाबाबत निवेदन करण्यात आले होते.

(३) व (४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत परांडा, वाशी या तालुक्यामध्ये सन २०१२-१३ व त्यापूर्वीचा (कुशल व अकुल) रु.३.६८ कोटी इतक्या रकमेची देयके प्रलंबित आहेत. भूम तालुक्यातील कोणतेही देयके प्रलंबित नाहीत. मौजे खासापुरी, ता. परांडा येथील प्रलंबित देयकाचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सादर करण्यात आला आहे. तसेच खासापुरी, ता.परांडा, जि.उस्मानाबाद येथील प्रलंबित मजूरीची देयके प्रदान करण्याच्या अनुषंगाने मा.मंत्री (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखाली व मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांच्या उपस्थितीत दि.२६/९/२०१६ रोजी मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत ठरवून दिलेल्या कार्यपध्दती प्रमाणे प्रलंबित देयके अदा करण्याची कार्यवाही करण्याचे निदेश आयुक्त, मनरेगा, नागपूर यांना देण्यात आले आहेत. प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भूसंपादन, प्रशासकीय आणि वनविभागाच्या मान्यतेशिवाय काही पाटबंधारे प्रक्ल्पांच्या वाढीव खर्चाला मंजूरी दिल्याबाबत

**(७) ८६२१७ (१२-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूसंपादन, प्रशासकीय आणि वनविभागाच्या मान्यतेशिवाय काही पाटबंधारे प्रकल्पांच्या वाढीव खर्चाला मंजूरी दिली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ५८ प्रकल्पांच्या खर्चात ९ हजार कोटींची वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) नाही. तथापी जलसंपदा विभागाच्या दिनांक ०९/१२/२०१३ च्या पत्रानुसार "प्रस्तावित असलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यता किमतीच्या तरतूदींच्या मर्यादेत व या पूर्वी मंजूर प्रशासकीय मान्यता/सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालाच्या व्याप्तीतील कामांसाठी आवश्यक "ब" भूसंपादन या उपशिर्षांतर्गत उदा. भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिन हस्तांतरण इ. साठी करावयाच्या वैधानिक कामांकरिता वर्षनिहाय मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदींच्या मर्यादेत खर्च करण्यास" शासनाने मान्यता दिली आहे. यामुळे

ज्या प्रकल्पांचा सु. प्र.मा. प्राप्त नाही अशा प्रकल्पांचा भूसंपादनापोटी होणारी वाढ टाळता आली आहे. तसेच शेतकऱ्यांना वेळेवर भूसंपादन मोबदला अदा करणे शक्य झाले आहे.
(२) नाही.
(३) राज्यातील प्रकल्प पूर्णत्वाच्या कोणत्या टप्प्यावर आहे, याबाबत आढावा घेवून त्या प्राध्यान्यक्रमानुसार व निधी उपलब्धतेनुसार प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमार्फत झालेल्या सार्वजनिक विहिरीवरुन पाईपलाईन व विद्युत पुरवठा करणेबाबत**

**(८) ८७०३२ (१२-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये बऱ्याच गावात सन २०१६-१७ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सार्वजनिक विहिरींची कामे सुरु करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी किती विहिरींची कामे पूर्ण करण्यात आली आहेत,
(३) असल्यास, सदरील पूर्ण झालेल्या ज्या विहिरीत पाणी उपलब्ध आहे अशा विहिरीचा उपयोग पाणी पुरवठा योजनेसाठी पाईपलाईन व विद्यूत पुरवठा करणे या संबंधी कामे करणे प्रस्तावित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०३-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) सन २०१६-१७ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत १२२ पैकी ३ विहीरींची कामे पुर्ण करण्यात आली आहेत.
(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून पाईपलाईन व विद्युत पुरवठा करणे यासंबंधीत कामे करणे प्रस्तावित नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजगुरुनगर (ता.खेड, जि.पुणे) येथील पंचायत समितीच्या विविध विभागांसाठी नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत**

**(९) ९४२६९ (१९-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरुनगर (ता.खेड, जि.पुणे) येथे पंचायत समितीची विविध विभागांची कार्यालये विखुरलेल्या स्थितीत असून जागा अपुरी असून नागरिकांची गैरसोय होत असल्याने सर्व कार्यालये एकाच इमारतीमध्ये आणण्यासाठी नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन प्रशासकीय इमारतीचा प्रस्ताव पंचायत समिती खेड यांच्या दिनांक ०७ एप्रिल, २०१७ रोजीच्या मासिक सभेत मान्यता घेऊन जिल्हा परिषद पुणे यांनी दिनांक २१ जून,२०१७ रोजी वा त्यासुमारास उपसचिव, ग्रामविकास यांना सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राजगुरुनगर पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. प्रशासकीय इमारतींच्या चालू बांधकामांना निधी देण्याचे दायित्व व चालू वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून राज्यातील नवीन पंचायत समिती बांधकामाबाबत मागणीचा प्राधान्यक्रम ठरवून पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली येथील जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीची झालेली दुरवस्था

**(१०) ९६८५८ (०३-०१-२०१८). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीची तसेच याठिकाणी उपलब्ध असलेले स्वच्छता गृहाचीही अत्यंत दुरवस्था झाली असून तेथील परिसर देखील अस्वच्छ असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रशासकीय इमारतीची पाहणी केली आहे काय व पाहणीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर जिल्हा परिषदेच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०७-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, पहाणी केली आहे.

पहाणीमध्ये स्वच्छता गृहाची नियमीत स्वच्छता केली जात असल्याचे व तळमजल्यातील फरशी काही प्रमाणात दबल्याचे आढळून आले आहे.
(३) जिल्हा परिषद प्रशासकीय इमारती अंतर्गत फरशी दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामे, परिसर व स्वच्छता गृहाच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद सेस मधून सन २०१७-१८ करीता रु. २०.५० लक्ष ची तरतूद करण्यात आली असून सदरची कामे प्रगतीत आहेत.

इमारत व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सन २०१८ मध्ये स्वयंरोजगार संस्थांची नेमणूक करण्यात आली असून त्यांच्या मार्फत इमारत व परिसर स्वच्छतेचे काम केले जात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी आणि नक्षलवादी भागात काम करणा-या जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत**

**(११) ९९०१७ (२२-१२-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी आणि नक्षलवादी भागात २००६ नंतर काम करणा-या जिल्हा परिषदेतील कर्मचा-यांचे एकस्तर वेतनश्रेणीचे दावे दोन महिन्यांच्या आत निकाली काढावेत तसेच तीन महिन्यांच्या आत त्यांचे थकीत वेतन द्यावे असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशानुसार सदरहू कर्मचा-यांचे वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१८) :** (१) होय.
(२) मा.उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयानुसार कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना शासनपत्र दिनांक २०.९.२०१७ अन्वये सूचना दिलेल्या आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी दिनांक १५.११.२०१७ च्या आदेशानुसार आदिवासी/नक्षलग्रस्त भागातील कार्यरत शिक्षक/कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ६.८.२००२ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने ६ व्या वेतन आयोगानुसार लाभ देण्याबाबत सर्व गटविकास अधिकारी/गट शिक्षणाधिकारी यांना कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, यवतमाळ कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावास त्या कार्यालयाच्या दिनांक २४.११.२०१७ च्या आदेशानुसार मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंजनगाव सुर्जी (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील पंचायत समितीच्या इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(१२) १००४१६ (२६-१२-२०१७). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील पंचायत समिती इमारतीची दुरवस्था झाली असल्याने पंचायत समिती येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या जीवाला धोका निर्माण झालेला असून अधिकाऱ्यांना कामकाज करण्याकरिता योग्य कार्यालयही उपलब्ध नाही तसेच नवीन पंचायत समिती इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार नवीन पंचायत समिती इमारतीचे बांधकाम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) अंजनगाव सुर्जी पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रस्तावास दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी रु. ४३१.७९ लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिरूर (जि.पुणे) तालुक्यातील बी.ओ.टी. प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या अनधिकृत गाळ्यांबाबत

**(१३) १००४३७ (०६-०१-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर (जि.पुणे) तालुक्यातील बी.ओ.टी. प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेले गाळे अनधिकृत असून त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची कोणतीही परवानगी नसताना तसेच या गाळ्यांच्या बांधकामांना पूर्णत्वाचा दाखला नसताना त्यांची शासकीय दफ्तरी नोंद झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर या गाळ्यांची परस्पर दफ्तरी नोंद करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०७-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

शिरूर (जि.पुणे) तालुक्यातील बी.ओ.टी. प्रकल्पास ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक २९.०४.२०१३ अन्वये शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली असल्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत बांधण्यात आलेले गाळे अनधिकृत नाहीत.

(३) प्रकल्प अद्याप पुर्ण झालेला नसल्यामुळे बांधकामाअंतर्गत गाळ्यांची नोंद केलेली नाही. त्यामुळे अधिकारी व ठेकेदारांवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील आंबेओहोळ, सोनुर्ले, धामणी, उचंगी, नागणवाडी, दूधगंगा, वारणा प्रकल्प निधी अणि भूसंपादनाविना प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) १००७७१ (२६-१२-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील आंबेओहोळ, सोनुर्ले , धामणी, उचंगी, नागणवाडी, दूधगंगा, वारणा असे अनेक प्रकल्प निधी अणि भूसंपादनाविना प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर प्रकल्प पुर्ण करण्यासाठी तात्काळ निधी व जमिन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) होय. आंबेओहोळ, धामणी, उचंगी, नागनवाडी या ४ प्रकल्पांची कामे मुख्य:त्वे पुनर्वसनाच्या अडचणीमुळे प्रलंबित आहेत. दुधगंगा प्रकल्पाच्या कालव्याची कामे भूसंपादन व पुरेशा निधीअभावी प्रलंबित आहेत. वारणा प्रकल्पाच्या कालव्याची कामे पुरेशा निधी अभावी प्रलंबित आहेत. सोनुर्ले प्रकल्पाचे काम यापूर्वी सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी प्रलंबित होते.

(२) या प्रकल्पांना सन २०१७-१८ मध्ये रू.३०७.६१ कोटी व सन २०१८-१९ मध्ये रू.८० ४७ कोटी (कामासाठी व भूसंपादनासाठी) इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बचत गटाना बँक कर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्याबाबत**

**(१५) १०१३६० (२६-१२-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १ कोटी ८० लाखाचा निधी प्राप्त असताना महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यास बँका टाळटाळ करत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दीड वर्षा पासून २६७ बचत गटाचे कर्ज प्रकरणे प्रलंबीत असून दुसरीकडे नवीन बचत गटाचे खाते उघडण्यासाठी बँका तयार नसल्याने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेला निधी उपलब्ध करुन देण्यास शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बँकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०७-२०१८) :** (१) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडील प्राप्त अहवालानुसार सन २०१७-१८ मध्ये शासनस्तरावरुन रु.१.८४ कोटी रक्कम खेळते भांडवल (RF) साठी मिळाले असून सर्व खर्च झालेला आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात नांदेड जिल्हयातील १६ तालुक्याचे भौतिक उद्दिष्ट ४७९१ बचत गटांसाठी देण्यात आलेले आहे. त्यापैकी नांदेड जिल्हयातून (जिग्राविय, माविम व नाबार्ड) २९६३ बचत गटांचे कर्ज प्रकरणांचे प्रस्ताव संबंधीत बँक शाखांमध्ये सादर करण्यात आलेले असून त्यापैकी डिसेंबर, २०१७ अखेर १६९९ कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आलेले आहेत.

नांदेड जिल्हयासाठी आर्थिक दृष्टया रु.४१.२१ कोटीचे उद्दिष्ट असून त्यापैकी रु.३८.३१ कोटीचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहे व डिसेंबर, २०१७ अखेर रु.१८.३४ कोटी कर्ज संबंधीत बचत गटांना बँकांमार्फत वितरीत करण्यात आलेले आहे. सदरील बाबतची साध्यपूर्तीची टक्केवारी भौतिक ५७% व आर्थिक ४८% एवढी आहे.
(२) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडील प्राप्त अहवालानुसार २६७ बचत गटांचे खाते उघडण्यासाठीचे प्रकरणे बँकांकडे प्रलंबीत होती. त्यापैकी ३१ मार्च, २०१८ अखेर बँकांनी १९६ बचत गटांचे खाते उघडले असून ७१ बचत गटांचे खाते उघडणे प्रलंबीत आहे. ७१ नवीन बचत गटांचे खाते उघडण्याबाबत बँकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) जिल्हास्तरावरुन जिल्हास्तरीय बँकर्स आढावा बैठकीत दि. २९.०७.२०१७, दि. ४.१०.२०१७, दि. २९.१२.२०१७ सदरील बाबत जिल्हाधिकारी नांदेड यांनी वारंवार संबंधीत बँकेच्या वरीष्ठ अधिकारी यांना सर्व पात्र प्रलंबीत प्रकरणे निकाली काढण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्यानुसार बँकांनी इष्टांक पूर्ण करण्याचे मान्य केले आहे.

दि. ०७.१२.१०२७ रोजी राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीमध्ये बँक स्तरावरुन प्रलंबीत कर्ज प्रकरणे, नवीन बँक खाती उघडण्याबाबत होणारी दिरंगाई या प्रश्नांबाबत सखोल चर्चा करण्यात आली. सदर बैठकीमध्ये बँकांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे निराकरण करण्याबाबत मान्य केले.

स्वयंसहाय्यता समूहांना जास्तीत जास्त कर्ज उपलब्ध करुन देण्याकरीता स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ बडोदा, आयसीआयसीआय बँक, आयडीबीआय बँक इ. बँकांसोबत करारनामा करण्यात आला आहे.

वेळोवेळी विभागीय स्तरावरील आढावा कार्यशाळेत संबंधीत जिल्हयांच्या Lead District Manager व बँकेचे जिल्हा समन्वयक यांचा प्रलंबीत प्रस्तावांचा निपटारा करण्याबाबत आढावा घेऊन, प्रस्तावाचा निपटारा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

**सांगली जिल्हयामध्ये जिल्हा परिषदेच्या अनेक इमारती धोकादायक असल्याबाबत**

**(१६) १०१४२९ (२६-१२-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयामध्ये जिल्हा परिषदेच्या शिक्षण, आरोग्य व इतर विभागाच्या अनेक इमारती धोकादायक असून यामध्ये अपघात होण्याची शक्यता असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणकोणत्या विभागाच्या किती इमारती धोकादायक बनल्या आहेत व या धोकादायक इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, सदर धोकादायक इमारती तात्काळ निर्लेखित करुन या ठिकाणी नवीन इमारती बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सांगली जिल्हा परिषदेच्या विविध विभागाच्या अखत्यारितील एकूण ४८५ इमारती धोकादायक बनल्या आहेत. सदर धोकादायक इमारतींचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

शिक्षण विभाग - २५८, आरोग्य विभाग-२७,

पशुसंवर्धन विभाग-२५, ग्रामपंचायत विभाग-१४०,

बांधकाम विभाग-२२ व महिला व बालकल्याण विभाग-१३.

उपरोक्त ४८५ धोकादायक इमारतींपैकी ३२० इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आलेले आहे.

(३) ४८५ धोकादायक इमारतींपैकी ३५१ इमारती निर्लेखित (पाडण्यात) करण्यात आलेल्या असून या इमारतींच्या बदल्यात संबंधित उपभोक्ता कार्यालयाकडून मंजूरी मिळाल्यानंतर नवीन इमारतींचे बांधकाम करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा निहाय तालुक्यातील सर्व बांधकामांची कामे करण्यासाठी सुशिक्षीत बेरोजगार स्थापत्य कंत्राटदारांना परवानगी देण्याबाबत**

**(१७) १०१५९१ (२२-१२-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा निहाय तालुक्यातील १५ लाखांच्या आतील सर्व बांधकामांची कामे करण्यासाठी सुशिक्षीत बेरोजगार स्थापत्य कंत्राटदारांना परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शुन्य आधिरित अर्थसंकल्पामुळे शासनाकडून नोकरी अथवा रोजगार मिळण्याची संधी मिळत नसल्याने राज्य भरातील ६५ हजारापेक्षा अधिक अभियंते बेरोजगार झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ग्रामविकास विभागाच्या दि.२५ मार्च, २०१५ रोजी काढलेल्या शासननिर्णयामुळे सदर अभियंते कर्जबाजारी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कामे केलेल्या अभियंत्यांना कामाची देयके देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) ज्या ग्रामपंचायती विकासकामे एजन्सी म्हणून करण्यास तयार नसतील अशी कामे, तसेच रु.१५.०० लक्ष पेक्षा जास्त किंमतीची विकासकामे, सुशिक्षित बेरोजगार अभियंते व इतर यांना विहित प्रमाणात देण्याचे धोरण अस्तित्वात आहे.
(४) कामे केलेल्या अभियंत्यांना त्यांच्या कामाची देयके वेळोवेळी जिल्हा परिषदेमार्फत अदा करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातून जिल्हा परिषदेंतर्गत करण्यात आलेल्या कामांची कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत

**(१८) १०२६८१ (०४-०१-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातून जिल्हा परिषदेंतर्गत करण्यात आलेल्या कामांची महत्वपूर्ण कागदपत्रे गहाळ झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद भंडारा ग्रामीण विकास यंत्रणेच्या NRHM विभागात आग लागून व्हावचर फाईल व कॅशबुक जळाल्याबाबत

**(१९) १०३६७८ (०६-०१-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद भंडारा ग्रामीण विकास यंत्रणेच्या NRHM विभागात आग लागून व्हावचर फाईल व कॅशबुक दिनांक ८ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास जळालेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकरणाचा पोलीस व इलेक्ट्रिक विभागाचा अहवाल प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार प्रकल्पातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०७-२०१८)** : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा भंडारा कार्यालयातील सहायक लेखा अधिकारी व दोन वरिष्ठ सहायक लेखा यांना निलंबित करण्यात आले आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा भंडारा यांनी वरिष्ठ सहायक लेखा व सहायक लेखा अधिकारी यांना अटक केली असल्याबाबत कळविलेले आहे. तपासाची पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येवला (जि.नाशिक) तालुक्यासाठी शेतकऱ्यांना शेततळ्यांचा लाभ मिळण्याकरिता लक्षांक वाढवून देण्याबाबत

**(२०) १०५२२७ (०४-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) येथे ४६१८ शेतकऱ्यांनी मागेल त्याला शेततळे या योजनेमधून शेतकऱ्यांसाठी अर्ज केलेले असून त्यातील ७३० शेतकऱ्यांना शेततळ्याचा लाभ मिळाला तर ३८८० शेतकरी शेततळ्यांसाठी असलेल्या लाभाच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार येवला तालुक्यासाठी शेतकऱ्यांना शेततळ्यांचा लाभ मिळण्याकरिता लक्षांक वाढवून देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही. "मागेल त्याला शेततळे" या योजनेंतर्गत येवला (जि.नाशिक) तालुक्यात दि.३१/३/२०१८ पर्यंत ६५१८ शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेले आहेत.त्यापैकी तांत्रिक दृष्टया पात्र अर्जाची संख्या ५१८५ इतकी आहे. पात्र ५१८५ अर्जाच्या अनुषंगाने ४८०३ लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. त्यापैकी विविध कारणामुळे २६८६ शेततळी रद्द करण्यात आली असून ११६० शेततळी पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच ९२ शेततळयाची कामे सुरु आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात शासनातर्फे मागेल त्याला शेततळे योजना राबविण्याबाबत**

**(२१) १०५७६५ (०४-०४-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनातर्फे मागेल त्याला शेततळे देण्याची योजना राबविण्यात आली, परंतु या योजनेंतर्गत जिल्हयातील प्रत्येक तालुक्याला १२५ प्रमाणे शेततळयांचे उद्दिष्ट देण्यात आले त्यापैकी धुळे जिल्हयात आतापर्यंत फक्त ६२ शेततळे पूर्ण करण्यात आली असून सदर योजनेला अल्प प्रतिसाद मिळत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेला प्रतिसाद अल्प प्रमाणात मिळत असल्याने ही योजना ग्रामीण भागात राबविण्याबाबत व जनजागृती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे. "मागेल त्याला शेततळे" ही मागणी व अनुदान तत्वावावरील योजना असुन शेततळयांचे काम पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी लाभार्थ्याची आहे. या योजनेअंतर्गत धुळे जिल्हयात ५०० शेततळयांचा लक्षांक देण्यात आला आहे. त्यानुसार ३०४ शेततळयांना कार्यारंभ आदेश देण्यात आला असून मार्च २०१८ अखेर ९० शेततळी पूर्ण करण्यात आली आहेत.

(२) योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रात योजनेची प्रचार व प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. तसेच, गावागावातील सभांमध्ये, शासकीय कार्यक्रमांमध्ये योजनेबाबत जनजागृती करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनेच्या**
**रोजगार निर्मितीत झालेली घट**

**(२२) १०६५०७ (२८-०३-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनेची घसरण झाली असून सन २०१५-१६ मध्ये सरासरी प्रती कुटुंब मनुष्य दिवस निर्मिती ६० होती, सन २०१६-१७ मध्ये ४९ दिवसापर्यंत खाली आल्याचे मनरेगाच्या वार्षिक अहवालातील आकडेवारीतून माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा) योजनेच्या रोजगार निर्मितीत घट झालाचे मनरेगाच्या वार्षिक अहवालात सदर बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रोजगार हमीच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन ग्रामीण भागातील मजूरांना जास्तीत जास्त रोजगार निर्मिती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे
(२) हे खरे नाही.
(३) मागणी आधारीत योजना असल्याने मागणी आल्यास मजुरांना कामे पुरविली जातील यासाठी पुरेसा निधी उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिवसा नगरपंचायत अंतर्गत (जि.अमरावती) रोजगार हमी योजनेची कामे करण्यासाठी शासनाने परिपत्रक निर्गमित करण्याबाबत

**(२३) १०६६७७ (२८-०३-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील तिवसा नगरपंचायत अंतर्गत रोजगार हमी योजनेची कामे करण्यासाठी शासनाने परिपत्रक निर्गमित न केल्यामुळे मागील ३ वर्षापासून रोजगार हमी योजनेची कामे बंद आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तिवसा नगरपंचायतमधील रोजगार हमी योजनेच्या व जॉबकार्ड वितरण व्यवस्था सुरु करण्याबाबत अंमलबजावणी न झाल्याने नगरपंचायत समितीच्या सदस्यांना दिनांक २६ जानेवारी, २०१८ रोजीपासून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तिवसा नगरपंचायत क्षेत्रात रोजगार हमी योजनेची कामे तात्काळ सुरु करण्यासाठी शासन परिपत्रक निर्गमित करुन आदेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. तथापि त्यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या निवेदनात आमरण उपोषण करणेबाबत कळविले आहे.
(३) राज्यात "क" वर्ग नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करणेबाबत शासन निर्णय दिनांक ३ मार्च, २०१४ अन्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे तिवसा नगरपंचायत क्षेत्रासाठी वेगळ्याने परिपत्रक काढण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कौंढर दत्तमंदिर ते चिवेली बंदर (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) इतर जिल्हा रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(२४) १०६९६८ (२८-०३-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कौंढर दत्तमंदिर ते चिवेली बंदर (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) हा रस्ता एकूण ११ कि.मी लांबीचा असून सन २०१५-१६ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून या रस्त्याचे केवळ ३/०० ते ४/५० कि.मी लांबीच्या रस्त्याचे काम करण्यात आले असून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये सदर रस्त्यांच्या ०/०० ते ११/ लांबीमध्ये काम करण्याचे शासनाने प्रस्तावित केले असल्याचे मा.राज्यमंत्री, ग्रामविकास यांनी लोकप्रतिनिधींना लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामास अद्यापही सुरुवात करण्यात आली नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्याचे काम सुरु करणाऱ्यास दिरंगाई करणाऱ्यावर कारवाई करण्यासह रस्त्याचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०१८) :** (१) मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांनी लोकप्रतिनिधींना लेखी स्वरुपात कळविल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) माजरे कोंढर चिवेली या १०.२० कि.मी. लांबीच्या रस्त्याला रु.६६४.१६ लक्ष इतक्या रक्कमेची शासन निर्णय दि.०८/०२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर काम निविदा प्रक्रियेत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयात शेततळ्यांचे उद्दीष्ट पूर्ण करण्याबाबत**

**(२५) १०९०५० (०४-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयात ४ हजार ५०० शेततळे तयार करण्याचे उद्दीष्ट असतांना आतापर्यंत केवळ १ हजार ७९० शेततळी तयार झाली असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामांच्या अंमलबजावणीबाबत कृषी विभागाच्या उदासीनतेमुळे कामे पूर्ण होण्यास विलंब लागत असल्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील कामांना सुरुवातही होऊ शकली नाही,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अमरावती जिल्हयातील शेततळ्यांचे उद्दीष्ट पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-०६-२०१८) :** (१) होय.
(२), (३) व (४) माहे डिसेंबर, २०१७ वा त्यादरम्यान बऱ्याच प्रमाणात खरीप हंगामातील पिकांची काढणी झाली नसल्याने व पीक काढणीच्या अवस्थेत असल्याने शेततळे खोदण्याची यंत्र सामग्री शेतामध्ये आणण्यात अडचण येत होती. त्यामुळे काढणी नंतर लगेच शेततळयांच्या कामांना सुरुवात करण्यात आली. सद्यस्थितीत ३५२२ शेततळयाची कामे पूर्ण झाली असून १९५ कामे प्रगतीपथावर आहेत.

क्षेत्रीय स्तरावर आढावा बैठका घेऊन लक्षांक पूर्ण करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**नांदेडसह मराठवाडयातील शेततळ्यांची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(२६) १०९१६९ (०४-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात मागेल त्याला शेततळे या योजनेअंतर्गत उदीष्टाच्या अवघे २९ टक्के काम झाले असल्याचे दिनांक २९ डिसेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे दुष्काळी भागासाठी महत्वाच्या ठरणा-या या योजनेकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नांदेड जिल्हयात सदर योजना तात्काळ राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-०६-२०१८) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. नांदेड जिल्हयात दि.२९ डिसेंबर, २०१७ रोजी "मागेल त्याला शेततळे" योजनेअंतर्गत १२८८ कामे सुरु होती. त्यापैकी ११७८ शेततळी पूर्ण होऊन ११० कामे प्रगतीपथावर होती. सद्य:स्थिती नांदेड जिल्हयात १४८३ शेततळयाची कामे पूर्ण झाली असून ५२ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) व (४) क्षेत्रीय स्तरावर बैठका घेवून लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची कार्यवाही करण्यात येऊन "मागेल त्याला शेततळे" योजनेअंतर्गत नांदेड जिल्हयाचा दिलेला लक्षांक पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

---

**'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत परभणी जिल्हयात**
**शेततळ्याची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(२७) ११००६० (०४-०४-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यासाठी ३ हजार शेततळ्यांचे उद्दिष्ट असतांना जिल्ह्यात केवळ १३०५ शेततळेच पूर्ण झालेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेततळ्याची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. "मागेल त्याला शेततळे" योजने अंतर्गत परभणी जिल्हयात दिनांक ९/४/२०१८ पर्यंत ३५८४ लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असून, त्यापैकी १५१५ लाभार्थ्यांनी शेततळी पूर्ण केली आहेत. उर्वरीत शेततळयाची कामे लाभार्थ्यांकडून पूर्ण करुन घेण्याबाबत क्षेत्रिय स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## कृष्णा भिमा स्थिरीकरण योजना प्रलंबित असल्याबाबत

**(२८) ११००७१ (१०-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा भिमा स्थिरीकरण योजना अनेक वर्षापासुन प्रलंबित असल्यामुळे जिल्हा परिषद सोलापूर यांनी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण बैठकीमध्ये सदर योजना पूर्ण व्हावी यासाठी सर्वानुमते एक मताने ठराव मंजुर करून तो शासनाकडे पाठविलेला असल्याचे माहे जानेवारी १८ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कृष्णा भिमा स्थिरीकरणासाठी जनतेची प्रचंड मागणी असताना ही शासनाने अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्याचे निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कृष्णा भिमा स्थिरीकर तातडीने योजना कार्यान्वीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०७-२०१८) :** (१) नाही.

(२) प्रथम कृष्णा पाणी तंटा लवादाने राज्यास उपलब्ध केलेल्या संपूर्ण पाण्याचे नियोजन यापूर्वीच झाले असून त्यानुसार प्रकल्पांची कामे देखील जवळपास पूर्ण झाली असल्याने कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पासाठी पाणी उपलब्ध नाही. दुसऱ्या कृष्णा पाणी तंटा लवादाचा अंतिम निर्णय दि.२९/१०/२०१३ रोजी जाहीर झाला असून, त्यानुसार एका उपखोऱ्यातून दुसऱ्या उपखोऱ्यात पाणी वळविण्यास लवादाने बंदी घातली आहे. त्यामुळे उर्ध्व कृष्णा उपखोऱ्यातून भीमा उपखोऱ्यात पाणी वळविणे शक्य होणार नाही. पर्यायाने भीमा स्थिरीकरण प्रकल्पासाठी उर्ध्व कृष्णा उपखोऱ्यातून पाणी उपलब्ध होवू शकणार नाही. तथापि द्वितीय कृष्णा पाणी तंटा लवादाने राज्यास भीमा उपखोऱ्यात सरासरी विश्वासार्हतेने उपलब्ध केलेल्या पाण्यातून सदर प्रकल्पास पाणी उपलब्ध करणे शक्य होईल किंवा कसे याचा अभ्यास करण्यात येत आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने तेलंगणा व आंध्रप्रदेश राज्यांच्या याचिकांच्या अनुषंगाने लवाद निवाडयास स्थगिती दिली असल्याने अद्याप केंद्र शासनाच्या राजपत्रात अधिसूचित झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हयात ग्रामीण व शहरी भागासाठीच्या घरकुल योजनाची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२९) ११०५०७ (०९-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत हिंगोली जिल्हयातील ग्रामीण भागासाठी गतवर्षी ३ हजार ७१५ घरकुलांना मंजूरी मिळालेली असून त्यापैकी केवळ ७३१ घरकुलाची कामे पूर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घरकुल लाभार्थ्यांची कामे झाल्याप्रमाणे त्या त्या टप्प्यावर तीन हप्त्यात निधी वितरीत करण्याबाबत शासनाचे धोरण असताना शासकीय व प्रशासकीय अडचणीमुळे घरकुल योजना अडकून पडल्या असल्याने लाभार्थ्यींना उघडयावर रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच निधी अभावी पूर्ण झालेल्या घरकुलाच्या लाभार्थींना अद्यापपर्यंत नियमानुसार देय असलेली रक्कमही मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, त्यानुसार हिंगोली जिल्हयात ग्रामीण भागासाठीच्या मंजूर करण्यात आलेल्या सर्व घरकुल योजनाची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०६-२०१८) :** (१), (२) व (३) नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दांडेली, आरोस, कोंडूरा (ता.वेंगुर्ला, जि,सिंधुदुर्ग) या मार्गाचे रुंदीकरण करताना बागायतदारांचे झालेले नुकसान

**(३०) ११०७७३ (०९-०४-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दांडेली, आरोस, कोंडूरा (ता.वेंगुर्ला, जि,सिंधुदुर्ग) या ४ कि.मी. मार्गाचे रुंदीरकण, खडीकरण व डांबरीकरणाचे तसेच संरक्षण भिंत बांधण्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्याच्या रुंदीकरण कामासाठी विना मोबदला जमीन देणा-या जमिनधारकांना बागायतीच्या बाजूला असेलेली गावठी झाडे कंत्राटदाराने तोडल्यामुळे बागायतदारांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बागायतदारांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

रस्त्याच्या रुंदीकरणासाठी तोडावी लागणारी झाडे बागायतदारांनी स्वत: तोडून घेतलेली आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरळा कळमोडी मध्यम प्रकल्पांतर्गत भीमाशंकर आदिवासी उपसा सिंचन योजनाच्या त्रुटींबाबत**

**(३१) १११९०० (२८-०३-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरळा कळमोडी मध्यम प्रकल्पांतर्गत भीमाशंकर आदिवासी उपसा सिंचन (ता.खेड, जि.पुणे) योजना भामा आसखेड धरण विभाग यांचेकडून जलसंधारण विभागाकडे हस्तांतरित करून एकलहरे व कुडे या दोन्ही योजनांचे प्रारूप प्रकल्प दिनांक २० जुलै,२०१६ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ ऑगस्ट,२०१६ रोजीच्या शासनपत्र अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करण्याबाबत तसेच धरणाच्या जलाशयातून प्रकल्पीय सिंचन क्षेत्राच्या ६ टक्के पर्यंत उपसा सिंचनासाठी असलेल्या मर्यादित क्षेत्रातून सदर प्रकल्प असल्याने त्याकरिता जलसंपदा विभागाकडून करण्यात येणाऱ्या उपसा सिंचनाबरोबरच दोन्ही योजनांचे क्षेत्र समाविष्ट आहे किंवा कसे याबाबत खुलासा जलसंपदा विभागाकडून प्राप्त करून घेण्याची आणि सदर योजनेसाठी खात्रीशीर पाणी उपलब्ध असलेबाबत जलसंपदा विभागाचे प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) होय.

(२) सदरील दोन्ही योजनांचे क्षेत्र कलमोडी प्रकल्पांतर्गत समाविष्ट नाही.

सदर उपसा सिंचन योजना ही जलशयातून ६ टक्के पर्यंत अनुज्ञेय वैयक्तिक उपसा सिंचन योजनेमधून प्रस्तावित असल्याने वेगळया पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जेष्ठ जलतज्ञ यांच्या समितीने सादर केलेल्या शिफारशींबाबत**

**(३२) १११४३० (११-०४-२०१८). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेष्ठ जलतज्ञ डॉ.माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने जलसंपदा विभागासाठी स्वतंत्र नियमावली असावी व इतर बाबींमध्ये सुधारणा करावी अशा शिफारशी असणारा अहवाल माहे मार्च,२०१४ मध्ये शासनास सदर केलेला असून सदर अहवालानुसार विचार करण्यासाठी निवृत्त कार्यकारी संचालक एस.एन.एसहस्त्रबुध्दे यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती नेमली व काही दिवसात त्यांच्याऐवजी निवृत्त कार्यकारी सचिव ए.पी.भावे यांच्य अध्यक्षतेखाली समिती नेमण्यास आली व सदर समितीने माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये जलसंपदा विभागाच्या सचिवाना अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.माधवराव चितळे समितीने सादर केलेल्या अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे तसेच त्यावर ए.पी.भावे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, जलसंपदा विभागाची स्वतंत्र नियमावली तयार करण्याबाबतचा अहवाल १३ महिन्यापासून सादर करून देखील अद्यापपर्यंत त्यावर कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त अहवालावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०७-२०१८) :** (१) होय.

(२) डॉ. माधवराव चितळे समितीने सादर केलेल्या अहवालाचे स्वरुप :-

सिंचनविषयक विशेष चौकशी अहवालाच्या खंड-१ मधील पृष्ठ ५२३ वर समितीने खालील प्रमाणे नमूद केले आहे.

जलसंपदा विभागांतर्गत असलेल्या कामाचे स्वरुप, कामाची व्याप्ती, प्रकल्पाच्या कामामध्ये तसेच उद्दिष्टामध्ये असलेल्या विविधांगी बाजू, सार्वजनिक बांधकाम विभागातील कामापेक्षा जलसंपदा विभागातील कामातील वेगळेपणा, कार्यपध्दतीमधील बदल, इत्यादी बाबींचा विचार करता जलसंपदा विभागातील कामासाठी स्वतंत्र नियम पुस्तिका तयार करणे अत्यावश्यक आहे. एकूणच जलसंपदा विभागाचा स्वतंत्र विभाग म्हणून कार्यरत राहण्याचा बराच मोठा कालावधी झाल्यामुळे जलसंपदा विभागाची स्वतंत्र नियम पुस्तिका तयार करण्याची गरज आहे.

श्री.ए. पी. भावे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालाचे थोडक्यात स्वरुप:-

प्रस्तुत नियामवली तयार करतांना विद्यमान महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीचा व उपलब्ध शासन आदेशाचा समितीने अभ्यास केला असून त्यामधील काही तरतूदींशी समिती सहमत नसल्याने तर काही तरतूद सद्यस्थितीमध्ये लागू नसल्याने समितीने आवश्यक वाटलेले बदल केले आहेत.

जलसंपदा विभागाकडील कामाच्या स्वरुपात झालेले बदल, नवनविन कार्यपध्दती, महामंडळ स्थापनेनंतर शासनस्तरावरुन निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रके, बदलेले तांत्रिक व माहिती तंत्रज्ञान, संगणक वापरामुळे झालेले कार्यपध्दतीतील बदल, प्रकल्प संकल्पन, प्रकल्पांचे कार्यान्वयन, तांत्रिक परीक्षण, सिंचन व्यवस्थापन, महामंडळाची कार्यपध्दत, जलसंपदा विभागातंर्गत कार्यरत अधिका-यांची कर्तव्ये, जबाबदारी व अधिकार तसेच सिंचन प्रकल्प सिंचन व्यवस्थापनास हस्तातंरण करण्याची कार्यपध्दती इत्यादी बाबींचा सर्वकंष आढावा घेऊन नियमावलीत समावेश करण्यात आला आहे.

(३) व (४) जलसंपदा विभागाच्या स्वतंत्र नियमावली तयार करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून, त्यावर विधि व न्याय विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाचे अभिप्राय नुकतेच प्राप्त झाले आहेत. त्यानुषंगाने नियमावली तयार करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात मजूराअभावी कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३३) १११५१० (०४-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाभार्थ्यांच्या पात्रतेसाठी असणा-या अनेक अटी, ऊस उत्पादक पट्टा ,जोडीला दुग्धव्यवसाय,औद्योगिक वसाहतीमुळे सधन असणा-या कोल्हापूर जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेला मजूर टंचाई जाणवत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या तीन वर्षात अवघ्या १९८ सिंचन विहिरीना मंजूरी मिळूनही मजूराअभावी कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्हयात मनरेगा अंतर्गत घेण्यात आलेल्या कामांना मजूरांची टंचाई जाणवली नसून संबंधित कामांची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्हयात सद्यस्थितीत एकूण १५२५ सिंचन विहिरी मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी १४५५ विहिरी पूर्ण झालेल्या आहेत व उर्वरित ७० विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे मजुराअभावी सदर कामे प्रलंबित नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात मागेल त्याला शेततळे योजना अयशस्वी झाल्याबाबत**

**(३४) १११७०८ (०४-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील फुलंब्री तालुक्यात मागेल त्याला शेततळे या योजनेला शेतक-यांचा प्रतिसाद मिळाला नसल्याने व या योजनेत शेतक-यांना कमी अनुदान तेही वेळेवर मिळत नसल्याने ही योजना अयशस्वी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या योजनेच्या अनुदानात वाढ करण्यासह अनुदान शेतक-यांना निर्धारीत वेळेत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-०६-२०१८) :** (१) नाही. "मागेल त्याला शेततळे" ही योजना अनुदान तत्वावरील योजना आहे. या योजनेंतर्गत ता.फुलंब्री जि.औरंगाबाद येथे ४१२ शेततळयांचा लक्षांक असताना ९३८ शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असुन त्यापैकी ८१० लाभार्थी पात्र आहेत.तसेच २५२ शेततळयांचे काम पुर्ण झाले असून १५ शेततळयांचे काम सुरु आहे. मार्च, २०१८ अखेर २१४ लाभार्थ्यांना शेततळयाचे अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालापूर (ता.चोपडा, जि.जळगांव) येथील गुळ मध्यम प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३५) १११८८७ (११-०४-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालापूर (ता.चोपडा, जि.जळगांव) येथील गुळ मध्यम प्रकल्पाच्या कामासाठी ११५ हेक्टर जमीन संपादित करावयाची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूसंपादनासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात आली नसल्याने या प्रकल्पाच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ सप्टेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री व मा.राज्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने भूसंपादनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) गुळ मध्यम प्रकल्पासाठी ९३.८३ हे. जमीन संपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) होय.

(३) गुळ मध्यम प्रकल्पाच्या कालवा वितरिका कामासाठी थेट खरेदी पध्दतीने जमीन संपादनाची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु असून, त्यानंतर निधीची मागणी करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा तालुक्यात रोजगार हमी योजनेतंर्गत मजुरांना काम देण्याबाबत**

**(३६) १११९९१ (०४-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा तालुक्यात रोजगार हमी योजनेतंर्गत मजुरांच्या हाताला काम मिळत नसल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार विविध योजनेंतर्गत मजुरांना काम मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

बुलढाणा तालुक्यात कामाची मागणी आल्यानंतर मजुरांना संबंधित ग्रामपंचायतमार्फत तात्काळ कामे उपलब्ध करुन देण्यात येतात.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजूरांनी कामाची मागणी केल्यानुसार ग्रामपंचायतअंतर्गत शेल्फवरील कामे त्यांना तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देहरेज मध्यम प्रकल्पातील (जि.पालघर) बुडीत क्षेत्रातील शेतक-यांचे पुर्नवसन करण्याबाबत**

**(३७) ११२३०८ (११-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील (जि.पालघर) देहरजी मध्यम प्रकल्पातील बुडीत क्षेत्रातील ५०० गरिब शेतक-यांनी प्रकल्पाच्या कामाचा बराच कालावधी गेल्याने नवीन घरे बांधलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन बांधलेल्या घरांमुळे त्यांचे क्षेत्रही वाढल्यामुळे शेतक-यांनी जुना सर्व्हे रद्द करुन नवीन सर्व्हे करुन त्याप्रमाणे विस्थापितांचे पुर्नवसन करावे अशी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार बाधित शेतक-यांना योग्य मोबदला देवून त्यांचे पुर्नवसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे, साखरे ग्रामपंचायतीच्या दि.२१/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार बुडीत क्षेत्रात अंदाजे २५ ते ३० घरे नव्याने बांधली गेली आहेत. तसेच खुडेद ग्रामपंचायतीच्या दि.२७/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानूसार बुडीत क्षेत्रात अंदाजे ६० ते ७० घरे नव्याने बांधली गेली आहेत.

(२) होय. साखरे ग्रामपंचायतीच्या दि.२१/०३/२०१८ च्या पत्रान्वये व खुडेद ग्रामपंचायतीच्या दि.२७/०३/२०१८ च्या पत्रानुसार नवीन सर्वे करून त्याप्रमाणे विस्थापितांचे पुनर्वसन करण्याची मागणी केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही. प्रकल्पग्रस्तांच्या घरांचा सर्व्हे सन २००६-०७ साली पूर्ण केल्यानंतर वनजमिनीच्या प्रस्तावास केंद्रशासनाची मान्यता, प्रकल्पाच्या घटक भागांच्या संकल्पनासाठी लागलेला कालावधी, वसई-विरार शहर महानगरपालिकेसोबत सामंजस्य करार न झाल्याने व पुरेशा निधीची अनुपलब्धता यामुळे प्रत्यक्ष प्रकल्पाचे काम अद्यापही सुरु झालेले नाही.

प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु करणेपूर्वी बाधित होणाऱ्या घरांचे फेर सर्व्हेक्षण करण्यात येवून प्रचलित नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचल (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) येथे अर्जुना धरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३८) ११२५८४ (११-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचल (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) येथे अर्जुना धरणाचे काम संथगतीने सुरु असून धरण प्रकल्पांबरोबर कालव्याचेही काम केले नसल्याने शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर धरणाचे काम कधीपर्यंत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे व त्याकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, या कामास लागणाऱ्या विलंबाची चौकशी करुन अर्जुना धरण व कालव्याची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) नाही. अर्जुना प्रकल्पांतर्गत धरणाचे काम पूर्ण झाले असून डावा कालवा कि.मी. १ ते १६ पर्यंतची कामे पूर्ण होत आली आहेत. उजवा कालवा कि.मी. १ ते १७ ची कामे प्रगतीपथावर आहेत. कालव्याची उर्वरित कामे बंदिस्त नलिका वितरण प्रणालीव्दारे डिसेंबर २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) धरणाचे काम सन २०१२ मध्ये पूर्ण झाले असून कालव्याच्या कामासह प्रकल्प डिसेंबर २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. याअनुषंगाने प्रकल्पाचा केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजने अंतर्गत समावेश करण्यात आला असून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु. ८०.०० कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिंडोरा बॅरेजचे (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) काम बंद असल्याबाबत

**(३९) ११३०२३ (११-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोरा बॅरेजचे (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) काम एका खाजगी कंपनीने सुरु केल्यानंतर प्रकल्पग्रस्त समितीने हे काम माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान बंद पाडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम बंद करण्याची कारणे काय आहे,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या काय आहेत व त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रकल्पग्रस्ताच्या मागण्या-प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या/निवेदने प्राप्त झाले असून (प्रत संलग्न) खालील प्रमाणे आहेत.

१) सन १९९२ ते २००० मध्ये ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित करण्यात आल्या होत्या. नवीन भूमीअधिग्रहन कायदा २०१३-१४ कलम २४(२) नुसार ते अधिग्रहन रद्द करणे क्रमप्राप्त आहे.

२) मागील १८ वर्षापासून शासनाने सातबारा रेकॉर्डवर संपादित जमीनीबाबतची नोंद व २०१६ मध्ये त्वरीत सातबारा मध्ये केलेली फेरफार रद्द करण्यात यावी.

३) जी शेतजमीन प्रकल्पामध्ये जात आहे ती अतिशय सुपिक व चांगली उत्पन्न देणारी असल्यामुळे ही शेतजमीन संपादित करणे योग्य नाही. तरी हा प्रकल्प रद्द करण्यात यावा.

दिंडोरा बॅरेज प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने दिलेल्या निवेदनाप्रमाणे दिंडोरा बॅरेज प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न समजावून घेऊन सद्य:स्थिती व भूसंपादन स्थिती विचारात घेवून वाढीव

मोबदला देण्याबाबत दि. २३.४.२०१८ रोजी सह्याद्री अतिथी गृह मलबार हील, मुंबई येथे मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत महामंडळाला सूचित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गिरणा नदीवर दहिगाव बंधा-यातील गाळ काढून पुर्नस्थापनेची कामे करण्यास निधी देणेबाबत**

**(४०) ११३०५५ (१२-०४-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरणा नदीवर दहिगाव बंधा-यातील गाळ काढून पुर्नस्थापनेची कामे करण्यास निधी उपलब्ध करुन मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले असता का.सं. (तापी) यांना कार्यवाही करण्याची निर्देश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापपर्यंत या संदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार गिरणा नदीवर दहिगाव बंधा-यातील गाळ काढून पुर्नस्थापनेची कामे करण्यास निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०७-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) हे खरे नाही. गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार योजने अंतर्गत शेतक-यांकडून स्वखर्चाने गाळ काढण्याची कार्यवाही सुरू आहे. मातीभराव आणि अश्मपटल सुस्थितीत असल्याने दुरूस्तीची आवश्यकता नाही. कालव्यावरील सेवापथ हा मातीधरणासाठी पोहोच रस्ता वापरणेत येत असून यांत्रिकी विभागामार्फत दुरूस्तीचे काम करणेचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील अनेक प्रकल्पांच्या बाबतीत तेथील अधिका-यांनी पुरवठादाराशी संगनमत करुन केलेला गैरव्यवहार**

**(४१) ११३०६५ (१३-०४-२०१८). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील पाटबंधारे विभाग, पूर्णा विभाग, लेंडी प्रकल्प, लघु पाटबंधारे प्रकल्प, परभणी, आणि विष्णुपुरी प्रकल्प क्रमांक २ व जलसंपदा विभागामध्ये सन २०१० ते १०१५ या

काळात नियमबाहय स्टेशनरी खरेदी करुन राज्य शासनाचे १४ कोटी रुपयांचे नुकसान केले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या प्रकरणी नांदेडच्या कविता स्टेशनरीच्या मालकांनी श्री. शिवप्रसाद गोपीकिशन तोष्णीवाल यांनी लोकायुक्तांपर्यत पाठपुरावा करुनसुध्दा मागील चार वर्षात दोषींवर कोणतीही कारवाई केली नाही,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेड जिल्हयातील अनेक प्रकल्पांच्या बाबतीत तेथील संबंधित बहुतांशी अधिका-यांनी पुरवठादाराशी मिळून गैरव्यवहार केला असल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषीं अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०८-२०१८) :** (१) व (२) या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीचे अनुषंगाने अधीक्षक अभियंता,दक्षता पथक,औरंगाबाद यांचेमार्फत प्राथमिक अन्वेषण करण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्राथमिक अन्वेषणांती प्रस्तुत प्रकरणी अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले असून, त्यानुषंगाने जबाबदार असलेल्या अधिका-यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद यांचेकडून दिनांक २९.०५.२०१८ च्या पत्रान्वये मागविण्यात आला आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधीतांविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

**मागेल त्याला शेततळे योजनेकरिता अर्ज करुनही शेतकऱ्यांना शेततळे मिळत नसल्याबाबत**

**(४२) ११३०९२ (०४-०४-२०१८). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१६ मध्ये शासनाने राज्यभरात मागेल त्याला शेततळे ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला मात्र शेतक-यांनी या योजनेकरिता अर्ज करुनही त्यांना शेततळे मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचनाची उपलब्धता वाढविण्यासाठी तसेच संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी योजना राबविण्याचा निर्णय घेतला प्रायोगिक तत्वावर या योजनेचा लाभ घेतलेल्या शेतक-यांना खरीप हंगामात पावसाच्या खडीत कालावधीत फायदाही झाला परंतु सध्यस्थितीत या योजनेकरिता अर्ज करुनही शेतक-यांना शेततळे मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतकऱ्यांना शेततळे मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही. "मागेल त्याला शेततळे" या योजनेंतर्गत राज्यात दिनांक ३१ मार्च, २०१८ अखेर ३,०६,२२७ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी तालुकास्तरीय समितीने १,९६,१४९ अर्जांना मंजूरी दिली होती. तसेच १,७५,४२६ शेतळयांना कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. आजमितीस ७७,५९२ शेततळयांची कामे पूर्ण झाली असून ५,३५३ शेततळयाची कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात फळबागाचे प्रमाण वाढत नसल्याबाबत**

**(४३) ११३१३० (११-०४-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेच्या नव्या रचनेत कृषी आणि कृषी संलग्न क्षेत्राशी संबंधित अकरा योजनाचा समावेश करण्यात आला असून, त्यापैकी पाच योजना थेट कृषी विभागाशी संबंधीत आहेत तथापि योजना राबविताना महसूल विभागाने कृषी विभागावर कुरघोडी केली असून, फळबागा वाढविण्यासाठी शेतकरी निवडीच्या अटी कृषी विभागाऐवजी महसूल विभाग ठरवत असल्याने शासकीय बंधने अधिक कडक होवून त्याचा परिणाम फळबागा न वाढण्यात झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २०१७-१८ साली ९४ हजार हेक्टर क्षेत्रावर फळबागा उभारण्याचे उद्दिष्ट असताना डिसेंबर, २०१७ अखेर केवळ १५ हजार हेक्टर व शेतकऱ्यांनी फळबागा उभारल्या असून शेतकऱ्यांनी नव्या योजनेकडे दुर्लक्ष केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार फळबागा वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-०६-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रमाची क्षेत्रीय स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने दि. ३ सप्टेबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये कृषि विभागाला अमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तसेच कृषी विभागाला अंदाजपत्रक तयार करणे, ई-मस्टर भरणे व पारीत करणे, कुशल व अकुशल मजुरीची देयके प्रदान करणे, तांत्रिक मान्यता देणे इ. अधिकार देण्यात आले आहेत या योजनेअंतर्गत सन २०१७-१८ या वर्षात १६०३० हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अनेक लाभार्थीचे अनुदान खात्यावर जमा झाले नसल्याबाबत**

**(४४) ११३६४६ (०४-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अनेक लाभार्थीचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजागर हमी योजनेतंर्गत आंबा आणि काजू या फळपिकांची लागवडीतील अनुदान अदयापी खात्यावर जमा झाले नसल्याचे माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच लाभार्थ्यांबरोबरच रोजगार सेवकांचेही मानधन प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार लाभार्थ्यांचे अनुदान व रोजगार सेवकांचे मानधन तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१) नाही, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत आंबा व काजू या फळपिकाची सन २०१७-१८ साठीची मजुरी व साहीत्याची रक्कम संबंधीताच्या नावावर जमा करण्यात आली आहे.

(२) नाही. सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे ग्रामरोजगार सेवकाचे मानधन संबंधीत ग्रामपंचायतीच्या खात्यावर जमा करण्यात आले आहे. संगमेश्वर तालुक्यातील ग्रामरोजगार सेवकाचे माहे फेब्रुवारी २०१८ चे मानधन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यात मागील ३ वर्षांपासून दुष्काळी परिस्थितीमुळे डाळींब फळपिकाच्या लागवडीत लक्षणीय घट झाल्याबाबत**

**(४५) ११४१८६ (०४-०४-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात मागील ३ वर्षांपासून दुष्काळी परिस्थितीमुळे डाळींब फळपिकाच्या लागवडीत लक्षणीय घट झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या समाधानकारक पावसामुळे डाळींब लागवडीसाठी मागणी मोठ्या प्रमाणात शेतक-यांकडून होत असून रोजगार हमी योजनेंतर्गत फलोत्पादन विकास कार्यक्रम सन २०१७-१८ या वर्षात नाशिक जिल्ह्यासाठी अद्यापही लक्षांक प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील वर्षी जिल्हयात १८०० हेक्टर डाळींब लागवडीसाठी मान्यता देण्यात आली असतानाही लागवड मुदत वाढवून न मिळाल्याने लागवड होऊ शकली नाही तसेच जलयुक्त शिवारामुळे जमिनीतील पाण्याच्या पातळीत वाढ झाली असल्याने शेतक-यांचा मोठ्या प्रमाणात फळ पिकाकडे कल असून डाळींब फळबाग लागवड करण्याकरीता उत्सुक आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत असलेल्या जाचक अटींमुळे शेतक-यांना लागवडीस अडचणी निर्माण झाल्या असून दोन हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्र व ६० वर्षाच्या पुढील शेतक-यास महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये लाभ घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासन रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यासाठी असलेल्या लक्षांकात वाढ करून उत्तर महाराष्ट्रासाठी डाळींब ५००० हेक्टर व त्यापैकी नाशिक जिल्हयासाठी ३००० हेक्टर डाळींब फळपिकासाठी लक्षांक मिळावे याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१) नाही.

(२) मा. मंत्री (कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली व मा.मंत्री (रोहयो) यांच्या सहअध्यक्षतेखाली दि.२५/४/२०१७ रोजी मंत्रालय मुंबई येथे झालेल्या बैठकीत राज्य रोजगार हमी योजनेमधून फळबाग लागवडीकरीता सन २०१७-१८ पासून लक्षांक न देण्याचा तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून लक्षांक देवून कल्पवृक्ष फळबाग लागवड योजना पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) दिनांक २२/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत फळबाग लागवडीसाठी दि. १५ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

(४) व (५) हे खरे नाही, सदर योजना केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार राबविण्यात येते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजनेंतर्गत सन २०१६-१७ व सन २०१७-१८ साठी नाशिक जिल्हयाला ५२०० हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवडीचा लक्षांक देण्यात आला आहे. त्यापैकी दि.३१ मार्च २०१८ पर्यंत १२५८.२० हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड झालेली आहे. या योजनेंतर्गत वार्षिक ग्रामसभेत क्षेत्र, पिक व लाभार्थी निवडीची मुभा देण्यात आली असल्याने मागणी प्रमाणे डाळींब पिकाची लागवड करणे शक्य आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील १७ गावांतील वंचति मजुरांना रोजगाराची कामे उपलब्ध करून देण्याबाबत

**(४६) ११४७७२ (०४-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील १७ गावांतील वंचति मजुरांना रोजगाराची कामे उपलब्ध करून देण्यात आली नसल्याबाबत तहसीलदार, मोखाडा यांच्या कार्यालयावर दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी श्रमजीवी संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी रोजगाराची मागणी केलेल्या मजूरांना कामे देण्याबाबत मा. मंत्री (वित्त व नियोजन), मा.मंत्री (आदवासी विकास), सचिव, (रोजगार हमी योजना) यांच्याकडे दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ वा त्यासुमारास समर्थन या संस्थेने लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोखाडा येथील ग्रामपंचायत हद्दीतील तसेच गाव-पाड्यांतील मजूरांनी रोजगाराची कामे मिळण्यासाठी तहसली प्रशासनाकडे २,२७२ अर्ज दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर मजूरांना तात्काळ रोजगाराची कामे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
दि.१.११.२०१७ रोजी श्रमजीवी संघटनेसमवेत कामाचे नियोजन करण्यासाठी आढावा बैठक घेण्यात आली.
(२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
मोखाडा तालुक्यातील १५ गावांतील १५९८ मजूरांनी कामाची मागणी केली आहे.
(४) मजूरांना त्यांच्या कामाच्या मागणीनुसार कामे पुरविण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेरणी ते कापणी पर्यंत शेतीची सर्व कामे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्याबाबत**

**(४७) ११५३५९ (०४-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुख्यमंत्री तसेच मंत्री आणि सचिव यांच्या सोबत झालेल्या दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या बैठकीत दिलेल्या कालावधीत पेरणी ते कापणीपर्यंत शेतीची सर्व कामे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्याबाबत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवरील कारवाई तसेच अन्य मागण्याबाबत अद्यापि कोणतीही कार्यवाही न झाल्यास लोकप्रतिनिधीनी, अचलपूर यांनी मंत्री महोदयांना आंदोलन करण्याबाबत लेखी इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पेरणी ते कापणी पर्यंत शेतीची सर्व कामे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्याबाबत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वातील प्रकरण पाच मधील परि. क्र. ७.३.२ अन्वये पेरणी ते कापणी ही कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत अनुज्ञेय नाहीत. यासाठी केंद्र शासनाची परवानगी आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव केंद्र शासनास दिनांक २२ मार्च, २०१८ च्या पत्रान्वये पाठविण्यात आलेला आहे. केंद्र शासनाकडून याबाबतचे आदेश प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे धामापूर (खालचावाडा)-बौध्दवाडी-भाटीवाडी-आंबेरी मार्गे चौके (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(४८) ११५६६७ (११-०४-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धामापूर (खालचावाडा)-बौध्दवाडी-भाटीवाडी-आंबेरी मार्गे चौके (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याच्या १/८०० ते ३/०० किमी लांबीच्या रस्त्याचे व चौके व्हाया बावखोल-आंबेरी ग्रामा-४०८ या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये मंजूर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरण, रुंदीकरणासह मजबूतीकरण कामासाठी माहे जानेवारी, २०१८ अखेरपर्यंत किती निधी ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदेला उपलब्ध करुन दिला आहे,
(३) असल्यास, मंजूर निधीच्या अनुषंगाने उक्त रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर रस्त्याच्या कामास मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये रु.४३०.३५ लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर कामाच्या ५ वर्षे नियमित देखभाल व दुरुस्तीसाठी रु.२७.१३ लक्ष इतकी रक्कम मंजूर आहे.कामाच्या प्रगतीनुसार आवश्यक तो निधी वेळोवेळी उपलब्ध करून देत आहे.
(३) सद्यस्थितीत या रस्त्यावर मातीकाम, मोऱ्या बांधकाम करणे, संरक्षक भिंत बांधण्याचे तसेच GSB चे काम प्रगतीपथावर आहे.

(४) सा.क्र. ५/२०० ते ५/९०० या ७०० मी. लांबी मधील जमीन मालकांनी हरकत घेतल्याने सदर लांबीमध्ये सद्यास्थितीत काम बंद आहे. जमीन मालकांशी चर्चा करून जमीन उपलब्धतेसाठी कार्यवाही सुरू आहे.

---

## भंडारा जिल्यातील नेरला उपसा सिंचन योजनेमध्ये जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत

**(४९) ११५७१८ (१२-०४-२०१८). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्यातील लाखनी तालुक्यात नेरला उपसा सिंचन योजनेकरिता परिसरातील शेतक-यांनी सन २००५-०६ मध्ये आपल्या उपजाऊ शेतजमिनी संपादित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संपादित करून १० ते १२ लोटूनही शासनातर्फे शेतक-यांना अद्याप मोबदला देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०७-२०१८) :** (१) नाही.

सन २००५-०६ मध्ये संपादित केलेल्या नसून सन २०१० मध्ये लाखनी तालुक्यातील ३६.२२ हे. खाजगी जमीन भूधारकाच्या संमतीने गोसीखुर्द प्रकल्पातंर्गत नेरला उपसा सिंचन योजनेच्या कालव्याकरिता ताब्यात घेण्यात आली होती.

(२) नाही.

उपरोक्त ३६.२२ हे. खाजगी जमीनीपैकी जिल्हाधिकारी भंडारा यांचे समितीने २४.८६ हे. जागेसाठी मूल्यांकनास मंजूरी दिली. त्यानुसार १५९ भूधारकांना मोबदला दिला आहे. परंतु ११.३६ हे. क्षेत्रातंर्गत शेतक-यांना अद्याप मोबदला मिळाला नाही.

(३) या प्रकरणी कलम - ६ ची कार्यवाही वर्ष २०१३ पर्यंत न झाल्याने सदर भूसंपादन प्रकरणे व्यपगत झाल्यामुळे सरळ खरेदीने २४.८६ हे. जमीनीचे संपादन करण्यात आले आहे. उर्वरित ११.३६ हे. भूसंपादन सरळ खरेदी पद्धतीने प्रस्तावित असून आपसी वाद, ७/१२ वर एकापेक्षा जास्त नावे असल्याने संमतीपत्र प्राप्त न होणे, मयत वारस नोंदी नसणे इत्यादी कारणामुळे प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामीण युवकांकरिता ओपन जिम बांधण्याबाबत**

**(५०) १२०६७७ (२०-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामीण युवकांकरिता ओपन जिमची आवश्यकता असून त्याकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत नाविण्य पूर्ण योजनेमधून रु.३० लक्ष मंजूर करण्यात यावेत अशी मागणी नागरिकांच्या वतीने स्थानिक लोकप्रतिनिधींनी करुनही अदयाप कोणतीही कार्यवाही शासनाने केली नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भातकुली तालुक्यातील खोलापूर, वाकी सायपूर, ढंगारखेडा (सोनारखेडा), निरुळ गंगामाई, वाठोडा (शुक्लेश्वर), धामोरी या भागातील ग्रामीण युवकाकरिता ओपन जिमची आवश्यकता असुन या सर्व ग्रामपंचायताकडे स्वत:ची मोकळी जागा असल्याने या जागेवर जिम बांधण्याची मागणी करुनही कोणतीही कार्यवाही करीत नसल्याने युवकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामीण युवकांकरिता ओपन जिम बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-१०-२०१८) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) जिल्हा स्तरावर संबंधित यंत्रणेला प्रस्तावित ठिकाणी ओपन जिमसाठी अंदाजपत्रक तयार करण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतीस "व्यायाम शाळा विकास अनुदान" या योजना अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये प्रस्ताव सादर करण्यास जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडून दिनांक १५.०३.२०१८ रोजी कळविण्यात आलेले आहे. संबंधीत ग्राम पंचायतीं कडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर जिल्हा नियोजन समिती अमरावतीचे मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.